# *बृहन्मुंबई महानगरपालिका*

## घन कचरा व्यवस्थापन खाते

केंद्र शासनाचा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५

अंतर्गत

पोटकलम ४(१) (बी) अन्वये

*घन कचरा व्यवस्थापन* खात्याची माहिती

## नियमपुस्तिका - ७

**घन कचरा व्यवस्थापन खात्याचे धोरण किंवा खात्याच्या प्रशासनाच्या बाबतीत मांडणी करण्याकरिता, नागरिकांशी विचार विनिमय करण्यासाठी किंवा नागरिकांच्या सभासदांद्वारे प्रतिनिधीत्व करण्यासाठी, एखादी व्यवस्था असल्यास त्याचा तपशील.**

**(दि. ३१.३.२०१५ पर्यंत सुधारीत)**

**धोरण किंवा खात्याच्या प्रशासनाच्या बाबतीत मांडणी करण्याकरीता, नागरिकांशी विचार विनिमय करण्यासाठी किंवा नागरिकांच्या सभासदांद्वारे प्रतिनिधीत्व करण्यासाठी एखादी व्यवस्था असल्यास त्याचा तपशील.**

महानगरपालिकेच्या घन कचरा व्यवस्थापन विभागाने नागरिकांचा सहभाग मिळविण्याकरीता प्रगत परिसर व्यवस्थापन ही संकल्पना राबविली आहे. या संकल्पने अंर्तगत सहकारी गृह संस्थेतील नागरिकांनी आपापल्या इमारती / सोसायटी किंवा एखादया रस्त्यावरील सर्व सोसायटी मिळून स्थानिक पातळीवर घन कचरा व्यवस्थापनाकरीता प्रगत परिसर समिती स्थापन करावी.

हया प्रगत परिसर व्यवस्थापन समितीची नोंदणी विभागपातळीत होणे आवश्यक आहे. सदर प्रगत परिसर व्यवस्थापन कमिटीचे मुख्य उद्दीष्ट स्थानिक पातळीवर कचरा वर्गीकरण करणे हा आहे. जेथे शक्य असेल अशा ठिकाणी ओल्या कच-याचे खत तयार करणे व सुका कचरा पुनर्चक्रिकरणाकरीता महानगरपालिकेने पुरविलेल्या सुका कचरा संकलन करणा-या वाहनांकडे जमा करावा अथवा अधिकृत कचरा वेचक संस्थेच्या लोकांना दयावा. यामुळे सदर परिसर स्वच्छ व सुंदर होतो.

प्रत्येक विभागात या कामाकरीता नोडल अधिका-याची नेमणूक करण्यात आली आहे. सदर अधिकारी प्रगत परिसर व्यवस्थापन गट व विभाग कार्यालय यांच्यामध्ये समन्वय साधतो. सहाय्यक आयुक्त यांच्या प्रगत परिसर व्यवस्थापन गटांबरोबर प्रत्येक दोन महिन्याच्या अंतरावर सभा घेतल्या जातात. व सदर सभेमध्ये प्रगत परिसर व्यवस्थापन गटांच्या विविध तक्रारी, सूचना यांचा आढावा घेतला जातो. सदर तक्रारी मुख्यतः झाडे छाटणी, पाण्याचे प्रदूषण, गटारे, रस्त्यावरचे खड्डे व मच्छरांसाठी धूम्र फवारणी, फेरीवालेव अनधिकृत बांधकामे याबद्दलच्या तक्रारीचे सदर सभेमध्ये निरसन केले जाते. या योजनेच्या प्रचार आणि प्रसिध्दि व माहिती देण्याकरीता मुंबई स्तरावर विशेष कार्य अधिकारी यांची नियुक्ती करण्यात आली आहे.